**अर्ज निशाणी क्रमांक ३७ वर आदेश**
(पारीत केलेला दिनांक **१५.०९.२०२३**)

०१. प्रस्तूत अर्ज वादीने वादपत्रावर दिनांक **२३.०६.२०२३** रोजीचा "**वादीचा पुरावा बंद केल्याचा"** आदेश रद्द करण्यासाठी दाखल केला आहे.

०२. प्रस्तूत अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल करुन कथन केले की, वादी हे प्रकरणात विलंब करीत आहेत. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०३. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

०४. वादी हे शेती कामात व्यस्त असल्यामुळे आणि कागदापत्रे उपलब्ध न झाल्यामुळे पुढील पुरावा देऊ शकले नाहीत. म्हणून वादपत्रावरील दिनांक **२३.०६.२०२३** रोजी **"वादीचा पुरावा बंद करण्याचा"** झालेला आदेश रद्द करणे उचित आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज **नि.क्र.३७** मंजूर करण्यात येतो.

२. वादपत्रावर दिनांक **२३.०६.२०२३** रोजी **"वादीचा पुरावा बंद करण्याचा"** झालेला आदेश वादीने प्रतिवादींना खर्च रक्कम रुपये ५००/-(पाचशे फक्त) देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

SUBHASH LAXMAN PHULE
Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2023.09.15 17:59:04 +0530

**(श्री. सुभाष ल. फुले.)**
**सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**
**जिल्हा लातूर.**

**दिनांक :- १५.०९.२०२३.**
**ठिकाण :- औसा.**